**नियमित दिवाणी दावा क्रमांक १७८/२०१२ मधील निशाणी क्र. ६४ वरील आदेश**
( तुकाराम गुंजाव व इतर वि. वामन गुंजाळ व इतर)

वादीने प्रस्तुत अर्ज स्वतःचा उर्वरित उलटतपास नोंदविण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक व्हावी म्हणून दिला आहे.

०२. वादीचा अर्ज, प्रतिवादीचे निशाणी ६६ वरील म्हणणे व कागदपत्रे वाचली. दोन्हीं विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. वादीने दाखल केलेल्या वैदयकिय कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, वादी दिनांक २०.०९.२०२३ ते ०५.१०.२०२३ रोजीपर्यंत डेंगी तपामुळे दवाखान्यामध्ये भरती होते. प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या दोन महिन्यानंतरचे हे वैदयकिय कागदपत्रे आहेत. वादीचा उलटतपास सुरु असतांना त्याचा रक्तदाब वाढल्याने उलटतपास थांबविण्यात आला. फक्त रक्तदाब यामुळे वादी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्याची मागणी करत आहे. वास्तविक पाहता केवळ रक्तदाब किंवा डेंगी या आजारामुळे वादीचा उलटतपास न्यायालयीन आयुक्तांमार्फत नोंदवावा हा दावा मान्य करण्याजोगा नाही. वादी उलटतपासाकरीता न्यायालयात अजिबातच येउ शकत नाही अशी कोणतीही परिस्थिती नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2025.07.05 17:04:20 +0530

स्थळः— इगतपुरी
दिनांकः— ०४/०७/२०२५

( मो. द. ननवरे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.